प्रेसनोट दिनांक ०४/०७/२०१९

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## घराचा गॅलरीचा दरवाजा अचानक बंद होऊन अडकून पडलेले महिलेची पोलीसांनी केली सुटका.

युनिटी कॉमप्लेक्स, १ ला मजला, फ्लॅट नंबर-१०३, कादरभाई चौक, ८५ रास्तापेठ, पुणे.येथे रजिन समीर झेंडेवाले या आपले पती व मुलांसमवेत रहातात. त्यांचा प्लॅट हा पहिल्या मजल्यावर आहे. दि.०४/०७/२०१९ रोजी दुपारी १२/३० वा. चे सुमारास त्या घरात एकटया असताना राहते फ्लॅटचे दरवाजा आतून लॉक करुन किचनमध्ये स्वयंपाक करीत होत्या. गॅस चालू करुन गॅसवर प्रेशर कुकरमध्ये वरण भात लावून त्या गॅलरीमध्ये पर्स अडकवण्यासाठी गेल्या . त्यावेळी गॅलरीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेला दरवाजा लॉक झाला होता. तो पावसामुळे फुगलेला होता. खुप वेळा प्रयत्न करुन देखील तो त्यांना उघडता येत नव्हता, दरम्यान त्यांनी किचनमध्ये गॅसवर ठेवलेल्या प्रेशर कुकरच्या सुमारे १० ते १२ शिट्या वाजून गेल्या होत्या. त्यामुळे गॅसवर कुकर ला लावलेला वरण भात जळून जावून त्याचा वास सुटलेला होता. गॅस बंद करणे गरजेचे होते. परंतु गॅलरीचा दरवाजा लॉक झाल्याने किचनमध्ये जाता येत नव्हते त्यामुळे किचनमध्ये गॅसवर असलेल्या प्रेशर कुकरचा स्फोट होईल या भितीने त्यांनी गॅलरीमधून खाली रोडवर जमलेल्या लोकांना मदतीसाठी हाका मारु लागल्या. परंतु फ्लॅटचा दरवाजा हा आतून बंद असल्याने व वरणभात जळालेला वास हा बाहेरपर्यंत येत असल्याने गॅस लिकेज झाल्याचा समज करुन घेऊन घाबरून कोणीही मदतीला येत नव्हते. त्यावेळी त्या भागात गस्त फिरत असलेगले समर्थ पोलीस ठाणे पुणे कडील तपासपथकातील पोशि. निलेश साबळे व अनिल शिंदे हे तेथे पोहोचले. गर्दी झालेली असल्याने त्यांनी काय प्रकार आहे म्हणून चौकशी करीत असताना त्यांना मदतीसाठी हाका मारत असलेल्या श्रीमती झेंडेवाले या दिसल्या. पोशि. निलेश साबळे यांनी क्षणाचाही विलंब न करता व आपले जिवाची भिती न बाळगता बिल्डींगचे तळमजल्यावरील खिडकीला लावलेल्या एसी कुलरचे बॉक्सवर पाय ठेवून त्यावरुन, फ्लॅटचे स्लॅबवर हाताने पकडून श्रीमती झेंडेवाले यांचे गॅलरीत पाहेचले व ते गॅलरीचा दरवाज्या उघडण्याचा प्रयत्न करु लागले. परंतु दरवाज्या उघडत नसल्याने त्यांनी कमरेच्या बेल्ट दरवाज्याचे कडीला गुंडाळून जोरात ताकदीने हिसका मारुन दरवाजा उघडला . त्यांनी श्रीमती झेंडेवाले यांना धीर देऊन प्रथम गॅस बंद करण्यास सांगितले. व कुकर हा किमान दोन ते तीन तास उघडू नका अशा सूचना दिल्या जेणेकरुन तयापासून अपघात होणार नाही .असे सांगून ते तात्काळ तेथून निघून देखील गेले. तथापी जाताना त्यांना झेंडेवाले यांनी तुमचे नांव काय व तुम्ही कोठे असता विचारले तेव्हा त्यांनी आपले नांव सांगून समर्थ पोस्टे येथे कामास असल्याची माहिती दिली. सायंकाळी त्यांचे पती इघरी आल्यावर त्यांनी पतीस घडलेला प्रसंग सांगितला असता त्याचे पती व त्या स्वतः समर्थ पोलीस ठाणे येथे येऊन पोशि. निलेश साबळे व समर्थ पोलीसांचे आभर व्यक्त करणेसाठी येऊन पोलीसांचे निस्वार्थी कामाचा अनुभ्ळाव आल्यास त्यांनी कथन केले आहे.

तरी आज दि.०४/०७/२०१९ रोजी दुपारी १२/३० वा. चे सुमारास मी माझे राहते घरी स्वयंपाक करीत असताना, गॅलरीत गेले त्यावेळी अचानकपणे गॅलरीचा दरवाजा लॉक झाला त्यावेळी माझ्या घरातील किचनमध्ये गॅसवर प्रेशर कुकर च्या शिट्या होवून वास सुटल्याने मी घाबरलेल्या अवस्थेत असताना समर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी निलेश साबळे यांनी स्वतःचे जिवाची पर्वा न करता. आमचे राहते बिल्डींगचे तळमजल्यावरील खिडकीला लावलेल्या एसी कुलरचे बॉक्सवर पाय ठेवून त्यावरुन, आमचे फ्लॅटचे स्लॅबरवर हाताने पकडून, मी उभ्या असलेल्या गॅलरीमध्ये प्रवेश करुन गॅलरीचा दरवाज्या उघडून माझा जिव वाचवला म्हणून मी त्यांचे मनापासून आभारी आहे.